
# सातवाहन घराणे ( इ. स.पू. 230 ते इ. स. 230 )




- सातवाहन यांचे राज्य वर्तमान महाराष्ट्र कर्नाटक व आंध्र प्रदेश या राज्यांच्या भूप्रदेशांत पसरले होते .
- आंध्र प्रदेशातील धरणीकोट व अमरावती, तसेच महाराष्ट्रातील जुन्नर व पैठण (जुने नाव प्रतिष्ठान ) ही सातवाहनांची प्रमुख ठाणी होती .
  ही सातवाहनांची राजधानी होती असेही दिसून येते .प्रतिष्ठान )पैठण), जीर्णनगर )जुन्नर), तगर )तेर), नेवासे, नाशिक अशी भरभराटीला आलेली शहरे या राजवटीत उदयास आली.
- या कारणामुळे इतिहास संशोधक त्यांना महाराष्ट्राचे राजे मानतात.
- नाशिक येथील बौद्ध लेणीच्या कोरीवकामात सातवाहन राजांनी कोरीवकामासाठी दान दिले असा उल्लेख
- चंद्रवंशी यादव कुळातील राजा सिमुक सातवाहन घराण्याचा संस्थापक मानला जातो .
- पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळच्या नाणेघाटातील लेण्यांमध्ये असलेल्या कोरीव लेखांमध्ये या घराण्यातील महत्त्वाच्या व्यक्तींची नावे आलेले आहेत काही सातवाहन राजे यांच्या नावाची आईचे नाव लावत असत .
  जसे की गौतमीपुत्र सातकर्णी.
- ज्याचे घोडे तीन समुद्रांचे पाणी प्यायलेले आहेत असा उल्लेख नाशिक येथील शिलालेखांमध्ये गौतमीपुत्रच्या मातेने केलेला आहे या उल्लेखावरून गौतमीपुत्र सातकर्णीचे मांडलिकत्व दक्षिणेतील अनेक राजांनी स्वीकारलेले होते असे दिसते

**सातवाहन राजघराणे**

- सम्राट अशोकाच्या वेळेस सातवाहन घराणे हे त्याचे मांडलिक होते.
- या घराण्याचा उल्लेख मत्स्य पुराणात व वायु पुराणात आला आहे कोण होते हे सातवाहन? पुराणांत त्यांना आंध्र असे म्हटले आहे. ते शूद्र (अवैदिक) वर्णाचे होते असाही उल्लेख पुराणे करतात. आंध्र म्हणजे ऐतरेय ब्राह्मण व महाभारतात ज्यांचा उल्लेख औंड्र असा आला आहे त्या वंशाचे.
- मुळचा हा पशुपालक समाज. महाभारतात औंड्रांना असूर राजा महाबळीचा पुत्र असे निर्देशिलेले आहे. औंड्र समाज दक्षीणेत पुरातन कालापासून वावरत होता. आजचे ओडिशा, आंध्र ही प्रदेशनामेही औंड्रांवरुनच पडलेली आहेत, यावरुन या समाजाचा व्यापक विस्तार लक्षात यावा. मावळालाही "आंदर मावळ" असे म्हटले जाते. "आंदर मावळ" (जुन्नरचा परिसर) आंध्र अथवा औंड्र मावळवरुन बनला असावा.

**सातवाहनांच्या इतिहासाची साधने** :

- ❖ कोल्हापूर, पैठण , कराड, नाशिक, भोकरदन , कौडीण्यापुर , नालासोपारा, तेर येथील उत्खनन .
- ❖ सर्वप्रथम पैठण येथे 1934 साली – गुलाम याझदानी यांच्या नेतृत्वाखाली , 1965 साली मोरेश्वर दिक्षित यांनी तर 1996 साली केंद्रीय पुरातत्व विभागाने उत्खनन केले.
- ❖ जोगळटेंभी येथे गौतमिपुत्र सातकर्णी यांची नाणी सापडली.
- ❖ कार्ले, भाजे, बेडसे, पितळखोर, अजंठा , कान्हेरी, जुन्नर, नाशिक येथील लेणी स्तूप, विहार व शिलालेख.
- ❖ मत्स्यपुरान , वायू पुराण , विष्णू पुराण यामध्ये माहिती.
- ❖ बृहतकथाकोश ह्या गुणाढ्या च्या तर राजा हाल च्या गाथा सप्तशती आणि धवलकाव्य या ग्रंथातून माहिती मिळते.

- ❖ टोलेमी हा परकीय तत्ववेत्ता नालासोपारा, चौल व कल्याण या बंदरांचा तर पैठण व तेर या बाजारपेठांचा उल्लेख करतो.
- ❖ पेरीप्लस ऑफ द एरिथ्रियन सी या ग्रंथात उलेख .

## राज्यकर्ते

सातवाहन काळात या राजघराण्याच्या तीस राज्यकर्ते होऊन गेले.
सातवाहनांच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी नाणेघाट हा प्रमुख मार्ग होता.
त्याच्याच तोंडाशी लेणे खोदून सातवाहनांनी आपल्या पराक्रमाची नोंद करून ठेवली आहे.

नाणेघाटातील शिलालेखात ब्राह्मी लिपीत कोरून ठेवलेली खालील नावे .

- राजा सिमुक सातवाहन,
- राणी नागनिका,
- राजा श्री सातकर्णी (नागनिकेचा पती),
- कुमार भाय
- महारठि गणकयिरो अथवा महारथी गणरयिर (राणी नागनिकेचे पिता),
- कुमार हुकुसिरी (राजपुत्र)
- कुमार सातवाहन (राजपुत्र)

**सिमुक सातवाहन (.यालाच सिंधुक असेही नाव आहे)इ.स. पू. 225 ते 212 .**

- सिमुक सातवाहन हा सातवाहनांचा पहिला राजा. सातवहन या मूळ पुरुषाचा हा नातू असावा. 23 वर्षे राज्य केले.
- त्याला महाराष्ट्रात राज्य स्थापन करण्यासाठी रथिक व भोज या दोन जमातींनी मदत केली. पुराणातील माहितीनुसार त्याने कण्व घराण्याचा शेवटचा राजा सुदार्मन / सुशर्माला पदच्युत करून शुंगांची सत्ता नष्ट करून आपले राज्य प्रस्थापित केले.
- सिमुक याने २३ वर्ष राज्य केले. नाणेघाट येथील लेण्यामध्ये त्याची प्रतिमा आहे. सिमुक सातवाहनाने संपूर्ण महाराष्ट्र जिंकून दक्षिणापथपती ही पदवी धारण केली होती. सिमुकाने तांब्याची व शिक्क्याची नाणी व्यवहारात प्रचलित केली होती

**कान्हा / कृष्ण सातवाहन( सिमुकचा धाकटा भाऊ.. ( इ.स. पू. 212 ते इ.स. पू.195 .)**

- सिमुकाचा भाऊ कृष्ण सातवाहन हा सत्तेवर आला.
- सातवाहनांच्या सत्तेचा विस्तार याच काळात झाला.
- नाशिकची लेणी सिमुकाच्याच काळात कोरली गेली असा उल्लेख तेथील शिलालेखात आहे.
- सिमुकाचा पुत्र श्री सातकर्णी हा लहान असल्याने राज्याची धुरा सांभाळण्याची संधी कृष्ण सातवाहनाला मिळाली.

**पहिला सातकर्णी (नागनिकेचा पती(. इ.स. पू. 195 ते इ.स. पू.185 .**

- सातवाहन वंशाचा संस्थापक सिमुक याचा हा पुत्र.
- साम्राज्यविस्ताराची अधिक माहिती नाणेघाट येथील शिलालेखात आहे.
- अप्रतिहतचक्र दक्षिणापथपती ही उपाधी त्याने स्वतःच्या नावापुढे लावली होती.
- कालिंगचा राजा खारवेल याचा पराभव केला .
- वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन केले.

**वेदश्री आणि सतश्री :**

- सातकर्णी पहिला ची मुले. वयाने लहान असल्याने आई रानी नागणिका हिने राज्यकारभार केला.

**सातकर्णी दूसरा ( इ.स. पू.166 ते इ.स. पू.111 .)**

- हतीगुंफा व भिलसा शिलालेखात उल्लेख. सांची स्तूप च्या तोरणावर याचा शिल्पकार आनंदाचा दान लेख .
- सातवाहन सत्तेस स्थैर्य प्राप्त करून दिले.
- माळवा प्रांत जिंकून घेतला.

**राजा हाल ( इ.स.20 ते इ. स. 24 )**

- प्राकृत भाषेला राजाश्रय.
- याने गाथा सप्तशती हा प्राकृत भाषेतील काव्यसंग्रह लिहिला. त्याच्या दरबारी पोट्टिस व आठयराज हे कवी होते.

**गौतमीपुत्र श्री सातकर्णी ( इ.स.106 ते इ. स. 132 )**

- गुजरात , कोकण, नाशिक, क्षेत्रात शकांचा शत्रप सहारत वंशातील नहपानच्या सत्तेस लगाम घातला.
- नाशिक शिलालेखात त्याचा उल्लेख **त्रिसमुद्र तोय पितवाहन** असा. याशिवाय त्याने **शकयवन पलवान: षूदन , सातवाहन कुल यश: प्रतिष्ठापण कर** अशाही उपाध्या घेतल्या. नावाच्या पुढे आईच्या नावाचा प्रथमच वापर.
- गौतमीपुत्र सातकर्णी राजाने शक दिनमान चालू केले

**वशिष्टी पुत्र पुलूवामी / पुलुमार्या ( इ.स.132 ते इ. स. 160 )**

- शक सातवाहन सोयरसंबंध प्रस्थापित केले. शक राजा रुद्रदमन याच्या मुलीशी भाऊ वशिष्टी पुत्र सातकर्णी शी विवाह.
- याच्या नाण्यावर जहाजाची चित्रे. व्यापार व नाविक सत्ता स्थापन केली असावी याचा टोलेमी च्या लेखनात उल्लेख.
- याच्याच काळात अमरावती येथील स्तूपचा जीर्णोद्धार.
- **दक्षिणापथेश्वर** उपाधी धारण केली. आंध्र व कुंतल भागात राज्यविस्तार

**वशिष्टी पुत्र सातकर्णी ( इ.स.150 ते इ. स. 156 )**

- पुलूवामी चा भाऊ. शकांकडून दोनदा पराभव.

**यज्ञश्री सातकर्णी**

- शेवटचा पराक्रमी राजा .
- जहाजाचे चित्र असणारे नाणे बडोदा क्षेत्रात सापडले.

**सातवाहन कालीन राज्यव्यवस्था :**

राजसत्ताक – राजा हा सार्वभौम . राजपद वंश परंपरागत. हिंदू धर्मशास्त्र नुसार राज्यकारभार. राजाला नाणी पाडण्याचा अधिकार

साम्राज्याची विभागणी विविध प्रांतात.
1) राष्ट्र : जनपदाचा मोठा घटक
2) अहर : प्रशासकीय विभाग
3) विषय : आहारपेक्षा छोटा भाग
4) पथ किंवा पथक : विषया पेक्षा लहान विभाग
5) ग्राम : प्रशासनातील शेवटचा घटक
( ग्रामणी /ग्रामपती / ग्रामकूट हा प्रमुख

**सातवाहन कालीन अधिकारी**

1) अमात्य : राजाचा सचिव.
2) महारठी : रठी म्हणजे राष्ट्र . रठी प्रदेशाचा अधिकारी.
3) महाभोज : भोज म्हणजे अधिकारी.
4) भांडगारिक : खजिनदार व कोषप्रमुख .
5) रज्जुक : महसूल अधिकारी
6) पाणियाघटक: पाण्याची व्यवस्था पाहणारा.
7) कर्मांतिक : बांधकामावर देखरेख ठेवणारा.
8) आवेशनीक : नियंत्रक म्हणून
9) गौल्मिक : गावांवर याचे नियंत्रण

## आर्थिक जीवन :

- शेती हा प्रमुख व्यवसाय . तलाव , कालवे, विहिरी यांची योजना .
- बृहतसंहिता मध्ये खरीप व रब्बी पिकांचा उल्लेख .
- पशुपालन : दूध व मांस यासाठी.
- व्यापार चालत असे. पश्चिम किनाऱ्यावर बंदरे होती. ( सोपारा, नालासोपारा, भडोच, कलीआण/कल्याण ) व्यापारामुळे निगम व श्रेणी अस्तीत्वात आल्या होत्या . नाशिक , जुन्नर व कार्ले येथे श्रेणी व्यवस्था होती.
- सोने , चांदी, पितळ, लोखंड, तांबे या धातूंचा उपयोग दागिने, मूर्ती , अवजारे बनवण्यासाठी .

- या काळात वस्त्रोद्योग होता. साधे , तलम व मखमली वस्त्र निर्मिती.
- कर : शेती उत्पन्नावर – उत्पन्नाच्या 1/10 भाग भूमीकर.

**भाषा :**

- प्राकृत ही अधिकृत भाषा . सर्व कोरीव लेख याच भाषेतून व ब्राह्मी लिपीत.

**नाणी किंवा चलन व्यवस्था :**

- चांदी , तांबे, शिसे व पोटीन धातूची . चांदीची नाणी चलनात.

**सामाजिक व धार्मिक जीवन :**

- सातवाहन स्वत: ब्राह्मण वर्णव्यवस्था स्थापणारे .
- संयुक्त कुटुंब पद्धती अस्तीत्वात . समाजात मातेस प्रतिष्ठा .
- प्रचलित वर्णव्यवस्था . जाती, उपजाती, पोटजाती यात भेद निर्माण झाले होते.
- वैदिक धर्माचे अनुयायी. शैव व वैष्णव धर्माबरोबर बौद्ध धर्माचा विकास.

**स्त्रियांचे स्थान :**

- योग्य मान . राज्यकारभार करत उदा. नायनिका व गौतमी बलश्री .
- भोजिका व महाभोजिका या स्त्री अधिकारी.
- धार्मिक स्वातंत्र्य. गौतमी बलश्री ने बौद्ध संघाला दान दिल्याचा उल्लेख